# कार्यालय नागपूर महानगरपालिका नागपूर

दुरध्वनी क्रमांक : ०७१२-२५६७०२८
Email ID : education.nmc@gmail.com

जा.क्र.शिवि./११९२/२०२०
दि.२६ /१२/२०२०

वाचले :-

१) साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५
३) मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचे आदेश क्र.जा.क्र.शि.वि./९५३/२०२०, दि.२९.११.२०२०
४) मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचे आदेश क्र.जा.क्र.शि.वि./१०२८/२०२०, दि.०९.१२.२०२०
५) उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४०/एसडी-६, दि. १० नोव्हेंबर, २०२०.

विषय :- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संघर्षजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश- लॉकडाऊननंतर टप्प्या-टप्प्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन) नागपूर महानगरपालिका क्षेत्रामधील शाळा सुरक्षितपणे सुरु करणेबाबत सुधारित आदेश.

## आदेश

ज्याअर्थी, टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (मिशन बिगिन अगेन) संदर्भात Covid-१९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी राज्य शानाने महाराष्ट्र राज्यात उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र Covid-१९ उपाययोजना नियम – २०२० अंमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास नागपूर महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राधाकृष्णन बी. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर क्षेत्रामधील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळा सुरक्षितपणे सुरु करणेबाबत खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

नागपूर महानगरपालिका क्षेत्रामधील सर्व प्रकारच्या शाळेत इ.९वी ते इ.१२वी चे वर्ग दि.०४ जानेवारी २०२१ पासून सुरु करणेस खालील मार्गदर्शक सुचना/ अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१. शाळा सुरु करणेबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेमार्फत दि.१० नोव्हेंबर २०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना/अटी (SOP) चे पालन करणे बंधनकारक राहील.
२. शाळेत स्वच्छता व निर्जंतुकीकरण विषयक सुविधा सुनिश्चित करणे कामी Thermometer, Thermal Scanner / Gun, Pulse Oxymeter, जंतुनाशक, साबण, पाणी इ. आवश्यक वस्तुंची उपलब्धता असलेबाबत शाळा प्रशासनाने दक्षता घ्यावी.
३. शाळा वाहतुक सुविधांचे निर्जंतुकीकरण नियमित होत असलेबाबत व याबाबत उपाययोजना केले आहे किंवा नाही याची शाळा व्यवस्थापनाने पडताळणी करणे आवश्यक राहील.

४. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी कोविड-१९ साठीची RTPCR चाचणी बंधनकारक असून चाचणीचे प्रयोगशाळेने दिलेले प्रमाणपत्र शाळा व्यवस्थापन समितीकडे सादर करणे आवश्यक राहील.

५. वर्गखोली तसेच स्टाफरुम मधील बैठकव्यवस्था शारीरिक अंतर (Physical Distance) च्या नियमानुसार असावी. तसेच वर्गामध्ये एका बाकावर एक विद्यार्थी या प्रमाणे नावानिशी बैठक व्यवस्था करावी.

६. शाळेत दर्शनी भागावर (Physical Distance), मास्कचा वापर इत्यादी संदर्भात मार्गदर्शक सुचना असणारे Poster / Stickers लावले का ? शाळेच्या अंतर्गत व बाहय परिसरामध्ये रांगेत उभे राहण्याकरीता किमान ६ फुट इतके शारीरिक अंतर (Physical Distance) राखले जाईल याकरिता विशिष्ट चिन्ह लावली आहे का ? शारीरिक अंतर (Physical Distance) राखण्यासाठी येण्या व जाण्याचे वेगवेगळे मार्ग निश्चित करणाऱ्या बाणाच्या खुणा केल्या आहेत का ? याबाबत शाळा व्यवस्थापन यांनी कार्यवाही करणे आवश्यक राहील.

७. विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी त्यांच्या पालकांची लेखी सहमती शाळा प्रमुखांनी प्राप्त करुन घ्यावी.

८. शाळेत व शाळेच्या परिसरात स्वच्छता व आरोग्यदायी परिस्थिती राखण्याकरिता शाळेचा परिसर दररोज नियमितपणे स्वच्छ केला जातो का? स्वच्छतागृहांचे वारंवार निर्जंतुकीकरण केले जाते का? याबाबतची संपूर्ण तयारी व साहित्य उपलब्धता आहे का? हे तपासण्याची जबाबदारी खाजगी शाळांचे बाबतीत शिक्षणाधिकारी, जि.प. माध्यमिक शिक्षण विभागाची राहील. तर म.न.पा. शाळेच्या बाबतीत शिक्षणाधिकारी, म.न.पा. यांची राहील.

९. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी शाळा वाहतुकीच्या वाहनाचे दिवसातून किमान २ वेळा (विद्यार्थी वाहनात बसण्याअगोदर व उतरल्यानंतर) निर्जंतुकीकरण केले जाते का? याबाबतची संपूर्ण तयारी व साहित्य उपलब्धता आहे का? हे तपासण्याची जबाबदारी खाजगी शाळांचे बाबतीत शिक्षणाधिकारी, जि.प. माध्यमिक शिक्षण विभागाची राहील. तर म.न.पा. शाळेच्या बाबतीत शिक्षणाधिकारी, म.न.पा. यांची राहील.

१०. वर्ग कोणत्याही परिस्थितीत बंद खोल्यांमध्ये भरविण्यात येऊ नये. Ventilation साठी वर्गखोल्यांचे दार व खिडक्या उघडया ठेवण्यात याव्यात. याबाबत शाळा व्यवस्थापनाने काळजी घ्यावी. Ventilation नसल्यामुळे खोल्यांमध्ये वर्ग भरविण्यात येऊ नये.

११. शाळा सुरु करण्याच्या अनुषंगाने पुर्वतयारीसाठी शाळा प्रशासनाने त्यांचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शाळेत उपस्थित राहणेबाबत सुचना द्याव्यात.

१२. शाळा सुरु करण्यापूर्वी या बाबतीतील वरील सर्व मुद्यांची पूर्तता झाली आहे, याबाबत अहवालचा माध्यमिक शिक्षणाधिकारी, जि.प. नागपूर व शिक्षणाधिकारी, म.न.पा. नागपूर यांनी मा.आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना सादर करावा.

१३. संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सुचना पुढील आदेशांपर्यंत लागू राहातील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाव्दारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि.२६.१२.२०२० पासून पुढील आदेशापर्यंत नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.२६.१२.२०२० रोजी निर्गमीत करण्यात येत आहे.

हस्ता/-

राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव :

१) मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, नागपूर
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
३) अतिरिक्त आयुक्त (शहर/सेवा/सामान्य)
४) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
५) शिक्षणाधिकारी, महानगरपालिका नागपूर
६) शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर
७) शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) जिल्हा परिषद नागपूर
८) सहा. आयुक्त, झोन क्र. १ ते १०, मनपा नागपूर
९) सर्व खाजगी माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक (मार्फत शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.)
१०) सर्व म.न.पा. माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक (मार्फत शिक्षणाधिकारी म.न.पा.)

प्रतिलिपी :

१) मा. महापौर/उपमहापौर/स्थायी समिती सभापती/सत्ता पक्ष नेता/विरोधी पक्ष नेता मनपा नागपूर
२) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
३) मा. जिल्हाधिकारी यांना माहितीकरिता सादर

26/12/2020

प्रीती मिश्रीकोटकर
शिक्षणाधिकारी
महानगरपालिका, नागपूर